मा.उच्च न्यायालय मुंबई व राज्यातील अधिनस्त न्यायालयांमध्ये कार्यरत बेलिफ यांना उपलब्ध करुन द्यावयाच्या ४G Internet Connectivity Plan च्या मासिक आवर्ती खर्चास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग,**
**शासन निर्णय क्र. संगणक-२०१९/प्र.क्र. ०३/का. ०७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ ऑगस्ट, २०१९.

वाचा :- केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांचे पत्र क्र. Spl./Com./२४/२०१९, दिनांक ०९.०१.२०१९व ०९.०४.१९.

**प्रस्तावना :-**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या संगणक समितीने, Electronic Services and Process करीता National Service & Tracking & electronic process (NSTEPS) हे Mobile Application विकसित केले आहे. National Service & Tracking & electronic process (NSTEPS) हे Mobile Application न्यायालयांमध्ये कार्यरत बेलिफ यांचेमार्फत न्यायालयाची आदेशिका बजावणेसाठी उपयुक्त असून, त्याकरीता Internet Connectivity आवश्यक आहे. यानुषंगाने केंद्रीय प्रकल्प समन्वयक मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी राज्यातील अधिनस्थ न्यायालयामध्ये कार्यरत २१६२ बेलिफ यांच्यासाठी मासिक १९५ याप्रमाणे ४G Internet Connectivity करिता येणाऱ्या आवर्ती खर्चाचा प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये शासनास सादर केला होता. त्यानुसार राज्यातील न्यायालयांमध्ये कार्यरत बेलिफ यांचेसाठी ४G Internet Connectivity उपलब्ध करुन देण्यासाठी येणाऱ्या आवर्ती खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा.उच्च न्यायालय मुंबई व राज्यातील अधिनस्त न्यायालयांमध्ये कार्यरत २१६२ बेलिफ यांना ४G Internet Connectivity करिता येणाऱ्या प्रत्येकी रु. १९५ (+१८% GST ) याप्रमाणे रु. ४,९७,४७६/- ( अक्षरी रु. चार लक्ष सत्याण्णव हजार चारशे शहात्तर फक्त ) इतक्या मासिक खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. याकरीता होणारा खर्च संबंधित बेलीफ ज्या न्यायालयाच्या आस्थापनेवर कार्यरत आहेत त्या न्यायालयाच्या “१३ कार्यालयीन खर्च” या उदिष्टांतर्गत संबंधित वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-१ उप विभाग-२ मधील अ. क्र. २७ (अ) नियम क्र. ७६ मधील २ व ३ या अटींच्या अनुषंगाने प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४८२ /१९ /व्यय-५ , दिनांक २४.०७.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२११५४७४२९९१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amogh
Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2019.08.21 15:52:43 +05'30'

**( अ. शां. कलोती )**
**विधि सल्लागार-नि-सह सचिव.**

**प्रति,**

१. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
२. केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
३. महालेखापाल (लेखा परीक्षा व लेखा अनुज्ञेयता ),-१/ २, मुंबई/नागपूर,
४. मा. सचिव, (व्यय ) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. संचालनालय, लेखा व कोषागारे , ठाकरसी हाऊस ३, मुंबई पोर्ट ट्रस्ट, २ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टे, मुंबई.
८. सह सचिव, कार्यासन-२३ व २४, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. निवड नस्ती.